Maharashtra Times, Wednesday, 2nd March, 2011

# गुणवत्ताधारकांसाठी विद्यापीठांनी प्रयत्न करावेत -डॉ. नारळीकर

कुलगुरू डॉ. दीपक टीळक, कुलसचिव डॉ. उमेश केसकर यांच्यासह आदींची उपस्थिती होती. एकूण बारा हजार ६४८ विद्यार्थ्यांना पदवी, पदविका प्रमाणपत्र देण्यात आले, तर ४२ विद्यार्थ्यांना पीएच. डी. प्रदान करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी उत्कृष्टतेची साथ न सोडता पुढे जावे तर उत्कृष्टतेच्या मागे जाणाऱ्यांना खेचू नका. त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देऊन त्यांना 'आगे बढो' असे म्हणा, असा संदेशही डॉ. जयंत नारळीकर यांनी विद्यार्थ्यांना दिला. 'एखादी गोष्ट पूर्णत्वास नेण्यासाठी जिद्द, सचोटी, महत्त्वकांक्षा हे गुण अंगी असणे आवश्यक ठरते. उत्कृष्टता सिद्ध करण्यासाठीही कणखरपणा लागतो. उत्कृष्टतेच्या जोरावर केंब्रिज विद्यापीठाने आठशे वर्ष आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असल्याशिवाय प्रवेश मिळत नाही. अशा गुणवत्ताधारकांना योग्य संधी मिळण्याची गरज आहे. अद्यापही आपल्याकडे विद्वानांची संख्या कमी असली तरी त्यांच्या उत्कृष्टतेची किंमत करण्याची जाण समाजात आहे,' असे नारळीकर यांनी सांगितले.

केंब्रिज विद्यापीठांमध्ये असताना सहकारी विद्यार्थ्यांबरोबर होणाऱ्या चर्चेमधून प्राध्यापकांना तेथे चांगलेच महत्त्व असल्याचे लक्षात आले. ब्रिटनमध्ये जातीभेद नसला तरी वर्गभेद पाहायला मिळतो. एका विद्यार्थ्याने त्याचे चार वर्ग पाडले होते. त्यात सर्वोच्च वर्गात राजकुटुंब, सरदार घराणी, दुसऱ्या वर्गात पुढारी, उच्च पदस्थ अधिकारी, व प्राध्यापक, तिसऱ्या वर्गात दुकानदार, व्यापारी तर चौथ्या वर्गात कामगारांचा समावेश होता. पहिला वर्ग हा शोभेसाठी होता तर दुसऱ्या वर्गात प्राध्यापकांना स्थान दिले होते. तेथील समाजात प्राध्यापकांची प्रतिमा उज्ज्वल आहे. समाजाला दिशा देणारा घटक म्हणून त्यांच्याबद्दल असलेला समज खरा आहे. प्रगत देशात विद्वानांना मानाचे स्थान दिले जात असताना देशात मात्र अशी परिस्थिती पाहायला मिळत नाही, अशी खंतही त्यांनी बोलून दाखविली.

'आजवर अनेक पुरस्कार मिळाले पण टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने दिलेली डी. लीट मोलाची वाटते. तो माझा सर्वात मोठा सन्मान वाटतो,' अशा शब्दांत पुरस्काराविषयीची भावना सहकारमहर्षी सा. रे. पाटील यांनी व्यक्त केली. शेती, सहकार व राष्ट्रसेवा दलात